| | |
|---|---|
| MHND180013102024 | खटला दाखल तारीख :– २९/११/२०२४<br>पंजीकृत तारीख :– २९/११/२०२४<br>निकालाची तारीख :– ०५/०६/२०२६<br>कालावधी **०१** वर्षे, **०६** महिने, **०८** दिवस |

**विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी (न्यायालय क्र.२) किनवट,**
**जि. नांदेड यांचे न्यायालय.**
<u>के.जी.मेंढे–पिठासीन अधिकारी</u>

**नियमित फौजदारी खटला क्र.१५०/२०२४** **नि.क्र.४०**

**फॉर्म क्रमांक–अ**

| | |
|---|---|
| **फिर्यादी/अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार मार्फत,**<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन किनवट. |
| **प्रतिनिधी/प्रतिनिधीत्व** | सहा.सरकारी अभियोक्ता श्री.डी.ए.झाडे |
| **आरोपी/ बचाव पक्ष** | **०१. पंकज पि. जयवंत बोंबले,**<br>वय– २१ वर्षे, धंदा–मजुरी,<br>**०२. कविता भ्र. जयवंतराव बोंबले,**<br>वय– ४५ वर्षे, धंदा–घरकाम,<br>**०३. जयवंतराव पि. फकीरराव बोंबले,**<br>वय– ५१ वर्षे, धंदा–मजुरी,<br>**०४. धुरपताबाई भ्र. दिनकर बोंबले,**<br>वय– ४३ वर्षे, धंदा–घरकाम<br>सर्व रा. दत्तनगर गोकुंदा,<br>ता. किनवट, जि. नांदेड, |
| **प्रतिनिधी/प्रतिनिधीत्व** | वि.विधीज्ञ श्री.आर.डी.सोनकांबळे |

**फॉर्म क्रमांक–ब**

| | |
|---|---|
| **गुन्हयाचा दिनांक** | २४/११/२०२२ |

| | |
|---|---|
| **प्रथम खबरेचा दिनांक** | २४/११/२०२२ |
| **दोषारोप दाखल दिनांक** | २९/११/२०२४ |
| **दोषारोप निश्चितीचा दिनांक** | १९/०३/२०२५ |
| **पुरावा सुरु होण्याचा दिनांक** | ०५/०२/२०२६ |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक** | निरंक |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | ०५/०६/२०२६ |
| **शिक्षा दिल्याचा दिनांक, लागु असेल तर** | लागु नाही |

**फॉर्म क्रमांक–क**

| आरोपीचा अनु क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोपीत गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा सिध्ददोषी | देण्यात आलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार वजावट होण्यासाठी आरोपीने कारावासात भोगलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१.<br>०२.<br>०३.<br>०४. | पंकज पि. जयवंत बोंबले,<br>कविता भ्र. जयवंतराव बोंबले,<br>जयवंतराव पि. फकीरराव बोंबले,<br>धुरपताबाई भ्र. दिनकर बोंबले, | नोटीसवर सोडण्यात आले | निरंक | कलम ४५२, ३५४, ३२४, २९४, ५०६ सह कलम ३४ भा.दं.वि. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## फॉर्म क्र.ड

### अभियाग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांच्या साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | शरद दिपक कोत्तापेल्लीवार | घटनास्थळ व जप्ती पंच |
| सा.क्र.०२ | सत्यभामा माधव मुनेश्वर | फिर्यादी |
| सा.क्र.०३ | विशाल माधव मुनेश्वर | साक्षीदार |

### ब. बचाव पक्ष साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क. न्यायालयाचे साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांनी निशांकित केलेली कागदपत्रे

### अ. अभियोग पक्षाची कागदपत्रे

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### ब. बचाव पक्षाने निशांकित केलेली कागदपत्रे

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क. न्यायालय

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. विशेष साहित्य (Material Object)**

| **अ.क्र. No.** | **वस्तुला दिलेले क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**न्या य नि र्ण य**

(आज दिनांक ०५/०६/२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचा खटला हा पोलीस स्टेशन, किनवट अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४५२, ३४, ३२३, २९४, ५०६ सह कलम ३४ अन्वये आरोपपत्र दाखल केल्यामुळे चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन आहे की, दिनांक २४.११.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी सत्याभामा हिचा मावसभाऊ रवि चौरे याने आरोपी पंकज यास त्याने दिलेले रुपये १०,०००/– परत मागीतले म्हणुन आरोपी पंकज, त्याची आई कविता, वडील जयवंत, काकु धुरपता यांनी फिर्यादीच्या घरात घुसुन फिर्यादीस ''छिनाल रांड'' अशी अश्लील शिवीगाळ करुन फिर्यादीच्या डाव्या हातावर भाजीपाला कापण्याच्या चाकुने मारहाण केली. आरोपी पंकज याने फिर्यादीस ''तु लय माजलीस का'' असे म्हणुन तिचा वाईट हेतुने पदर ओढुन कमरेला हात लावला. आरोपी कविता हिने फिर्यादीचा भाऊ रवि याच्या पायाला चावा घेतला व मानेवर नखाने बोखरले. आरोपी जयवंत याने रवि याच्या उजव्या हातावर लाकडाने मारले व कविता हिने फिर्यादीचे केस धरुन तिला घराबाहेर ओढत आणले व ''रांड तुला लय माज आला का?'' अशी अश्लील शिवीगाळ केली. आरोपी दिनकर व धुरपता यांनी फिर्यादीचा मुलगा विशाल याच्या पाठीवर लाथा बुक्यांनी मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीने घटनेचा रिपोर्ट दिला. त्यावरुन पोलीस स्टेशन किनवट यांनी आरोपींविरुध्द अपराध क्रमांक ७१/२०२३ नुसार भादंवि कलम ४५२, ३५४, ३२३, २९४, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्ह्याची नोंद केली व तपासाअंती

दोषारोपपत्र दाखल केले.

**३.** आरोपी हजर झाल्यानंतर त्यांच्या विरुध्द भादंविचे कलम ४५२, ३५४, ३२४, २९४, ५०६ सह कलम ३४ नुसार शिक्षापात्र अपराधाचे दोषारोप (नि.क्र.१२) निश्चीत केले. सदर दोषारोप आरोपींना वाचुन, समजावुन सांगितला असता त्यांनी तो नाकबुल करुन संपरिक्षेची मागणी केली. अभिलेखावर आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा दर्शक पुरावा किंवा दोषयुक्त स्थिती न आल्याने आरोपींचे फौ.प्र.सं. चे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविले नाहीत.

**४.** अभियोग पक्षातर्फे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी वकील श्री.डी.ए.झाडे आणि बचाव पक्षातर्फे विद्वान विधीज्ञ श्री.आर.डी.सोनकांबळे यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे व पुराव्याचे अवलोकन केले. खटल्याच्या न्यायनिवाडयाकरीता पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण झाले असुन त्यावरील निष्कर्ष कारणेमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, दिनांक २४/११/२०२२ रोजी दुपारी १५.०० वाजताच्या सुमारास मौजे दत्तनगर गोकुंदा, ता. किनवट येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादीच्या घरात घुसुन तिला व तिचा मावसभाऊ यांना दुखापतीची, हमल्याची अगर गैरविरोधाची भिती घालण्याची पुर्वतयारी करुन गृह अतिक्रमण केले आणि त्याव्दारे भा.द.वि.चे कलम ४५२ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ...नाही .. |
| २) | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्येशाने किंवा तशा जानीवेने तिच्यावर फौजदारी हमला केला व त्याद्वारे त्यांनी भा.द.वि.चे कलम ३५४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ..नाही .. |

| | | |
|---|---|---|
| ३) | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीला चाकु या प्राणघातक हत्याराने मारुन ईच्छापुर्वक दुखापत पोचविली व त्याद्वारे त्यांनी भा.द.वि.चे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ..नाही .. |
| ४) | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीला सार्वजनिक रोडवर आणुन ''रांड तुला लय माज आला का?'' अशी अश्लील शिवीगाळ केली व त्याद्वारे भा.द.वि.चे कलम २९४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ..नाही .. |
| ५) | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वर नमुद वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदारांना फौजदारीपात्र धाकदपटशा करुन जिवे मारण्याची धमकी दिली आणि त्याव्दारे भा.द.वि.चे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ..नाही .. |
| ६) | आदेश कोणता ? | ...अंतीम आदेशान्वये |

## निष्कर्षाची कारणमिमांसा

**मुद्दा क्र.०१ ते ०५ बाबत :–**

**५.** वरील सर्व मुद्दे एकाच घटनाप्रसंगातुन निर्माण झाले असल्यामुळे तसेच त्यावरील निष्कर्ष एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यावरील पुराव्याची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्दे एकत्रीत विवेचनास्तव घेण्यात आले. आरोपींविरुध्दचा दोषारोप लक्षात घेता अभियोग पक्षाने घटनेच्या दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी फिर्यादीच्या घरात गृहप्रवेश करुन अतिक्रमण केले, फिर्यादीला चाकुने मारले, तिचा विनयभंग करुन अश्लील शिवीगाळ केली, तिच्या मावसभावास काठीने हातावर व लाथाबुक्यांनी इच्छापुर्वक मारहाण केली अणि सार्वजनिक शांततेचा भंग केला बाबी वाजवी संशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

६. सा.क्र.०१ सत्यभामा ही खटल्यातील फिर्यादी, जखमी व स्वतः पिडीत साक्षीदार आहे. परंतु या महत्वाच्या साक्षीदाराने तिच्या प्रत्यक्ष पुराव्यात आरोपींविरुध्द कोणतीही गुन्हादर्शक बाब सांगितली नाही. याउलट दोन वर्षापुर्वी तिने आरोपींना दिलेले हात उसने रुपये दहा हजार परत घेण्याच्या कारणावरुन त्यांच्यात तोंडातोंडी वाद झाला या व्यतिरिक्त काहीही घडले नाही असे निक्षुन सांगितले. तिने पुढे तिला दाखविलेल्या फौप्रसं कलम १५६(३) नुसार दाखल केलेल्या अर्जातील मजकुर सुध्दा नाकारला.

७. सा.क्र.०३ विशाल हा फिर्यादी महिलेचे मुलगा असुन अभियोग पक्षाने त्यास घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणुन तपासले. परंतु या साक्षीदाराने सुध्दा अभियोग पक्षास पुरक साक्ष दिली नाही. तसेच अभियोग पक्षाने सुचविलेली घटना या साक्षीदारांनी स्पष्टपणे नाकारली.

८. सा.क्र.०१ शरद यास अभियोग पक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याचा साक्षीदार म्हणुन तपासले. परंतु साक्षीदाराने सुध्दा अभियोग पक्षास पुरक साक्ष दिली नाही.

९. एकंदरित आरोपींविरुध्द अभिलेखावर कोणताही गुन्हादर्शक पुरावा किंवा दोषयुक्त स्थिती आलेली नाही. त्यामुळे पुराव्या अभावी आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले कोणतेही दोषारोप सिध्द होत नाहीत. सबब, मी मुद्या क्रमांक ०१ ते ०५ वरील निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो. परिणामी, सर्व आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितचे कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी जामीन बंधपत्रे सादर केलेली आहेत. सबब, मुद्या क्रमांक ०६ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १) | सर्व आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ४५२,३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ नुसार शिक्षापात्र अपराधांच्या दोषारोपांतुन निर्दोष मुक्त करण्यात येते. |

| | |
|---|---|
| २) | जप्त घरगुती वापराचा चाकु व एक लाकडी काठी मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावेत. |
| ३) | आरोपींचे पुर्वीचे जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात. |
| ४) | आरोपींनी कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहिताचे पुर्ततेने सादर केलेले जामीन बंधपत्रे पुढील ०६ महिन्याच्या कालावधीसाठी अंमलात राहतील. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायलयात अधिघोषित करण्यात आला)

KASHINATH MENDHE
Digitally signed by KASHINATH MENDHE
Date: 2026.06.05 18:12:15 +0530

के.जी.मेंढे

**दिनांक : ०५/०६/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,**
ठिकाण : किनवट. **(कोर्ट नं.२), किनवट.**

**<u>Certificate</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Jr. Clerk | : | Nilwarn A.B. |
| Court Name | : | Court of Jt.J.M.F.C., Kinwat. |
| Date | : | 05.06.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 05.06.2026 |
| Order uploaded on | : | 05.06.2026 |

****